**मोटार अपघात प्रकरण १९४/२०२३**
**परमेश्वर वि. शिवाजी व इतर**
**निशाणी क्रमांक – १८**

**साक्षीदाराची पुढील सरतपासणी मार्फत त्यांचे विधीज्ञ श्री. एम.व्ही.माडगे यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

१. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. त्यातील मजकूर मी स्वतः वाचून पाहिलेला आहे. यादी निशाणी क्र.४ सोबत मी अपघाताच्या गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२५** वर आहे. एम.एल.सी. ची सत्यप्रत **निशाणी २६** वर आहे. अपघाताबद्दल मी दिलेल्या पोलीस तक्रारीची सत्यप्रत **निशाणी २७** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत **निशाणी क्र.२८** वर आहे. अपघाताच्या तपशीलाची सत्यप्रत **निशाणी २९** वर आहे. COMP प्रमाणपत्र **निशाणी क्र.३०** वर आहे. जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत **निशाणी क्र.३१** वर आहे. डॉक्टरांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्राची सत्यप्रत **निशाणी क्र.३२** वर आहे. दोषारोपपत्राची सत्यप्रत **निशाणी क्र.३३** वर आहे. माझे मुळ डिस्चार्जकार्ड **निशाणी ३४** वर आहे. औषधीचे मूळ बील (एकूण २८) यांना एकत्रीतरित्या सामनेवाला क्र.३ चा आक्षेप नोंदवून **निशाणी क्र.३५** देण्यात येते.

**सामनेवाला क्र.१ व २ एकतर्फा**

२. सबब उलटतपास काही नाही.

<u>**उलटतपासणी सामनेवाला क्र.३ तर्फे श्री.पी.के. कदीरे विधीज्ञ**</u>

**३.** ज्यावेळी अपघात झाला, त्यावेळी मी माझे मोटार सायकलवर जात होतो. मोटार सायकल चालविण्याचा वैध परवाना माझेकडे आहे. मला आता माझे वाहन चालविण्याच्या परवान्याची छायांकित प्रत दाखविण्यात आली. ती प्रत बरोबर आहे. ती प्रत **निशाणी ३६** वर आहे. त्या वाहन चालविण्याच्या परवान्यावर दुचाकी वाहन चालविण्याच्या परवानगीबद्दल उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेकडे दुचाकी वाहन चालविण्याचा वैध परवाना नाही आणि अपघात हा माझे चुकिमुळे झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये मला किरकोळ स्वरुपाचा मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रामध्ये खोटे सांगितले आहे की, अपघातामध्ये मला गंभीर दुखापत झाली आणि कायमचे अपंगत्व आले आहे.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी सहयाद्री हॉस्पीटलमध्ये औषधोपचार घेतल्याचे व माझेवर शस्त्रक्रिया झाली, याबद्दलचे मी कागदपत्र दाखल केले ते खोटे आहेत. अपघाताचे वेळी माझे वय ४०–४१ होते. माझी जन्म तारीख ०८.०३.१९८२ आहे. एस.टी.महामंडळामध्ये मी बस चालक म्हणून काम करतो. आज साक्षसाठी मी रजा टाकून आलो. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताचे पुर्वी आणि अपघाताचे नंतर आजपर्यंत मी एस.टी.महामंडळामध्ये बस चालक म्हणून कार्यरत आहे.

५. माझे वाहन चालविण्याचा परवान्याचे मी अपघातानंतर नुतणीकरण

केले आहे. परवाना निशाणी ३६ मी रद्द करुन घेतला नाही. परवाना हा दर तीन वर्षांनी नुतणीकरण करून घ्यावयाचा असतो, म्हणून मी माझा जुना परवाना जमा करुन नविन परवाना घेतला. मी माझे नुतणीकरण केलेल्या वाहन चालविण्याच्या परवान्याची प्रत अभिलेखावर दाखल करु शकतो. मे–२०२६ मध्ये मला एकूण मासीक वेतन रु.३३,४००/– मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यापासून ते आजपर्यंत माझे मासीक वेतनामध्ये नियमाप्रमाणे वाढ होत आलेली आहे.

६. माझा दावा आणि शपथपत्र माझे म्हणण्याप्रमाणे तयार करण्यात आलेले आहे. माझे दाव्यामध्ये माझी काम करण्याची क्षमता १०० टक्के गेली आहे असे नमूद आहे आणि माझे शपथपत्रामध्ये माझी काम करण्याची क्षमता ५० टक्के गेली आहे असे नमूद आहे. त्यापैकी माझे शपथपत्रामध्ये माझी काम करण्याची क्षमता ५० टक्के गेली हे बरोबर आहे. जेंव्हा दावा दाखल केला, तेंव्हा मी सात महिने घरी बसलो आणि काहीच काम करू शकत नव्हतो, म्हणून माझे दाव्यात असे नमूद करण्यात आले की, माझी काम करण्याची क्षमता १०० टक्के गेली.

७. हे म्हणणे खरे नाही की, माझे दाव्यामध्ये व शपथपत्रामध्ये हे नमूद नाही की, अपघातानंतर मी सहा–सात महिने घरी बसून होतो. माझे म्हणण्याप्रमाणे मला अपघातामध्ये गंभीर दुखापत झाली आणि कायमचे अपंगत्व आले त्यामुळे माझा वाहन चालविण्याचा परवाना रद्द करुन घ्यावा असे मला

वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला गंभीर दुखापत झाली नाही आणि मला कायमचे अपंगत्व आले नाही, म्हणून मी वाहन चालविण्याचा परवाना रद्द करुन घेतला नाही व नोकरीपासून राजीनामा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझे चुकिमुळे झाला तरी सुध्दा नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे साक्षीचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–

दिनांक :– २४/०६/२०२६

(आर.बी.भागवत)
जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा
सदस्य मोटार अपघात प्रा.,लातूर